मराठी माणसाचा मानदंड
# राजदंड
www.rajdand.com
। पश्चिम महाराष्ट्र ।
follow us : /rajdandlive
RNI Regd No.72105/99 * वर्ष २५ * अंक २८२ * सातारा * सातारा सोमवार दि. २४ जून २०२४ * पाने ८ * किंमत ५ रू/

## नीट पेपरफुटीचं महाराष्ट्र कनेक्शन; दोन शिक्षक ताब्यात


**लातूर** : नीट पेपरफुटी प्रकरणात दिवसागणिक नवी माहिती समोर येत आहे. आज होणारी नीट पीजी परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय आरोग्य मंत्रालयाकडून घेण्यात आलेला आहे. नीट पेपरफुटी प्रकरणात आता महाराष्ट्र कनेक्शन समोर आलं आहे. दोन शिक्षकांना नांदेड एटीएसकडून ताब्यात घेण्यात आलं आहे.

दोघांपैकी एक जण लातूरमध्ये, तर दुसरा सोलापुरात कार्यरत आहे. दोघेही जिल्हा परिषदेत शिक्षक आहेत. नांदेड एटीएसकडून त्यांची चौकशी सुरु आहे.

वैद्यकीय प्रवेश परीक्षेच्या पेपरफुटीचे धागेदोरे लातूरपर्यंत पोहोचले आहेत. नांदेड एटीएसनं लातूरमध्ये छापे टाकून जिल्हा परिषदेच्या दोन शिक्षकांना ताब्यात घेतलं. संजय जाधव आणि जलील उमरखाँ पठाण अशी त्यांची नावं आहेत. पेपरफुटी प्रकरणात त्यांचा सहभाग असल्याचा संशय एटीएसला आहे.

त्या अनुषंगानं त्यांची चौकशी केली जात आहे. लातूरमध्ये वास्तव्यास असणारे संजय जाधव मूळचे चाकूर तालुक्याच्या बोथी तांडाचे रहिवासी आहेत. ते सध्या सोलापुरच्या टाकळी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत कार्यरत आहेत.

तर लातूरच्या अंबाजोगाई रोड परिसरात राहणारे जलील उमरखाँ पठाण कातपूरमधील जिल्हा परिषदेच्या शाळेत शिक्षक आहेत. हे दोन्ही शिक्षक लातुरात खासगी कोचिंग क्लासेस चालवत होते अशी माहिती आहे.



## लोकसभा उपाध्यक्षपदावरून जोरदार रस्सीखेच

**नवी दिल्ली** : पंतप्रधाननरेंद्र मोदीयांच्या शपथविधीनंतर १८व्या लोकसभेचे पहिले सत्र सोमवार २४ जूनपासून सुरू होणार आहे. मोदी ३.० कार्यकाळातील हे पहिले अधिवेशन राहणार असून त्यात नव्या सदस्यांचा शपथविधी होणार आहे. त्यानंतरलोकसभाअध्यक्षांची

### या मुद्द्यांवरून वादळ

**३ जुलैपर्यंत अधिवेशन चालणार असून गेल्या १० वर्षांमध्ये प्रथमच मोदी सरकारसमोर मजबूत विरोधी पक्ष राहणार आहेत. नीट परीक्षेतील गोंधळ, लोकसभा निवडणुकीनंतर शेअर बाजारातील घडामोडी इत्यादी मुद्द्यांवरून विरोधक आक्रमक होऊ शकतात.**

**मणिपूरमधील हिंसाचार,बेरोजगारी, महागाई तसेच दोन मुख्यमंत्र्यांना अटक या मुद्द्यांवरून वादळी चर्चा होण्याची शक्यता आहे.**

# पहिलेच अधिवेशन ठरणार वादळी ?

निवड या अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी होण्याची शक्यता आहे. 'नीट' परीक्षेमधील घोळ, १५ राज्यांमध्ये ४१ वेळा झालेल्या पेपरफुटीच्या घटनांमुळे सरकार बॅकफूटवर आले आहे. नवसंजीवनी मिळालेल्या विरोधी पक्षांच्या इंडिया आघाडीची या मुद्द्यावरून सरकारला घेरण्याची तयारी असून लोकसभेचे पहिलेच अधिवेशन वादळी ठरण्याची शक्यता आहे.५८ मंत्र्यांनाही देणार शपथ

मोदी सरकारमधील ५८ मंत्री लोकसभेचे सदस्य आहे. त्यांनाहीलोकसभाध्यक्षशपथ देतील. २७ जून रोजी राष्ट्रपतींचे अभिभाषण होणार आहे. १ ते ३ जुलै या काळात दोन्ही सभागृहांमध्ये त्यावर धन्यवाद प्रस्तावावर चर्चा होईल. गेल्या कार्यकाळात हकालपट्टी झाल्यानंतर तृणमूल काँग्रेसच्या खासदार महुआ मोईत्रा यांचे पुनरागमन होणार आहे. त्याकडे सर्वांचे लक्ष राहणार आहे.

**अध्यक्षांची निवड कधी?**

**२६ जूनला अध्यक्षांची निवडणूक होणार आहे. जदयू आणि तेदेपा यांनाही या पदावर दावा केला आहे.मात्र, त्यांना उपाध्यक्षपद दिले जाऊ शकते. 'इंडिया' आघाडीने उपाध्यक्षपद मागितले आहे. ते न मिळाल्यास अध्यक्षपदासाठी उमेदवार उतरविला जाऊ शकतो.**

## सुषमा अंधारेंची सरकारवर घणाघाती टीका, शंभुराज देसाईंनी दिले प्रत्युत्तर



**पुणे** : पुण्यातून कोट्यवधींचे ड्रग्स पकडले गेले असताना आता थेट सर्रासपणे विक्री करतानाचा धक्कादायक प्रकार समोर आला. फर्ग्युसन रस्त्यावरील एका नामांकित हॉटलेमधून सर्रास ड्रग्स केल्याचा व्हिडिओ व्हायरल झालाय. या पार्टीमध्ये काही तरुण बाथरूम मध्ये ड्रग्ज घेताना आढळून आले. यावरून आरोप-प्रत्यारोप होत असून, ठाकरे गटाच्या उपनेत्यासुषमा अंधारेयांनी राज्य सरकारवर घणाघाती टीका केली असून, मंत्री शंभुराज देसाई यांनी प्रत्युत्तर दिले.


पुण्यात कल्याणीनगर अपघात प्रकरणानंतर पब, हॉटेल आणि बारवर पोलीस कारवाई सुरु झाली होती. एफसी रोडवरील एका पबमधील व्हिडिओमुळे पुन्हा एकदा राज्य उत्पादन शुल्क विभागासह पोलिस प्रशासनावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

या व्हिडिओमध्ये दिसणारा वेळ हा मध्यरात्री दीड नंतरचा असल्यामुळे पोलिस आणि उत्पादन शुल्क विभागाचे नियम धुडकावून पहाटे पाचपर्यंत पब सुरू असल्याचा आरोप देखील करण्यात येत आहे. याप्रकरणी पोलिसांनी दोघांना ताब्यात घेतले असून, पुढील तपास पोलिस करत आहेत. फर्ग्युसन रस्त्यावरील द लिक्वीड लिझर लाऊंज उर्फ एल३ हा पब पहाटे पाचपर्यंत सुरू होता, असा आरोप स्थानिकांकडून केला जात आहे.सुषमा अंधारेआणि रवींद्र धंगेकरांकडून मोठे आरोपएफसी रोडवरील एका नामांकित हॉटेलमधील व्हिडीओ व्हायरल झाल्याच्या प्रकारावरून राजपूत नावाच्या अधिकाऱ्याला महिन्याला तीन कोटी रुपये मिळतात, ते मंत्र्यांना पोहचात. तो हप्ताशंभूराज देसाईयांना जातो, असा मोठा आरोप रवींद्र धंगेकर यांनी केला. तसेच पुण्यातील ड्रग्ज प्रकरणावर आम्ही तब्बल आठ ते नऊ महिन्यापासून सातत्याने भूमिका मांडत आहोत. जेव्हा कोट्यवधींचे ड्रग्जचे साठे सापडले होते. तेव्हाही आम्ही शंभुराजे देसाई आणि गृहमंत्र्यांना प्रश्न विचारले होते.

शंभूराज देसाईयांनी तात्काळ आपल्या मंत्रीपदाचा राजीनामा दिला पाहिजे. शंभूराज देसाई यांच्यासाठी करणारे उत्पादन शुल्कचे अधिकारी राजपूत यांचेही निलंबन झाले पाहिजे. हे झाल्याशिवायपुणेसुधारणार नाही, अशी टीका सुषमा अंधारे यांनी केली. शंभुराज देसाई यांनी दिले प्रत्युत्तरसुषमा अंधारेंनी आम्ही काय म्हणत आहे ते घेतले पाहिजे. हा व्हिडिओ आताच पहिला. याची चौकशी आम्ही करू. रवींद्र धंगेकर आणि सुषमा अंधारे यांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे.

गेल्या महिन्याभरात आपण पुण्यात ४९ हॉटेल आणि बारवर कारवाई केली आहे. तसेच पुण्यात सरप्राईज चेकिंग सुरु करण्यात आले आहे. या प्रकारची गंभीर दखल घेऊन चौकशी करणार आहे. तेथील क्षेत्रीय अधिकाऱ्याचीही चौकशी करणार आहोत. कुठल्याही अधिकाऱ्याबरोबर सरकारचे साटेलोटे नाही. या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात येईल. जो अधिकारी यात दोषी आढळेल, त्यावर कारवाई केली जाईल, असे शंभुराज देसाई यांनी सांगितले.

## ४००-पार सरकार मलई खातेय : खा. असदुद्दीन ओवैसी



**बीड** : महाराष्ट्रातील बीड जिल्ह्यातील केज-लातूर आणि अहमदनगर-अहमदपूर राष्ट्रीय महामार्गावर ओबीसी समाजाने रस्त्यावर टायर जाळून निषेध केला. मराठा आरक्षणाला ओबीसी कोट्यातून विरोध होत आहे. एआयएमआयएम प्रमुख आणि हैदराबादचे खा. असदुद्दीन ओवैसी यांनी या घटनेनंतर केंद्रातील एनडीए सरकारवर हल्ला चढवला आहे. असदुद्दीन ओवैसी यांनी ट्विट करत प्रतिक्रिया दिली. आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्यांपर्यंत मर्यादित करण्यात आली आहे.

भारतातील अल्पसंख्याक, मागासवर्गीय आणि मागासवर्गीय लोकांना त्यांच्या ब्रेड आणि बटरसाठी लढायला लावले जात आहे आणि ४००-पार सरकार मलई खात आहे. आगामी संसदेच्या अधिवेशनात दुरुस्ती करून ५० टक्के मर्यादा हटवावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

बिहारमधील सरकारी नोकऱ्या आणि शैक्षणिक संस्थांमधील आरक्षण ५० टक्क्यांवरून ६५ टक्क्यांपर्यंत वाढवण्याचा निर्णय पाटणा उच्च न्यायालयाने रद्द केला. यानंतर महाराष्ट्रात मराठा आणि ओबीसी आरक्षणाचा मुद्दा जोर धरू लागला आहे. मनोज जरंगे-पाटील यांनी अधिसूचनेची अंमलबजावणी करण्याच्या म ागणी केल्यानंतर ओबीसींकडून आंदोलन सुरु आहे. त्यामुळे ओबीसींच्या मुद्द्यावरून बेमुदत उपोषणाला बसलेले लक्ष्मण हेके आणि मनोज जरंगे-पाटील यांच्यात वाद रंगला आहे.

महाराष्ट्र सरकार मराठा आणि इतर मागासवर्गीय (ओबीसी) समुदायांमध्ये तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप मनोज जरंगे-पाटील यांनी केला आहे. सरकारमध्ये मराठा समाजाचा द्वेष करणारे ८-९ लोक असून त्यांची नावे योग्य वेळी जाहीर केली जातील, असेही ते म्हणाले.

## पुढचा मुख्यमंत्री काँग्रेसचाच, खासदार विशाल पाटील अन् विश्वजित कदमांचा एल्गार



**सांगली** : राज्यात पुन्हा काँग्रेसचं सरकार आणायचं. वसंतदादांच्या विचारांचा, सांगली जिल्ह्याचा मुख्यमंत्री झाला पाहिजे असं विधान खासदार विशाल पाटील यांनी केले तर सांगलीचा मुख्यमंत्री असेल की नाही माहिती नाही परंतु राज्यात काँग्रेसचा मुख्यमंत्री झाला पाहिजे असं आमदार विश्वजित कदमांनी म्हटलं आहे. मिरजेत काँग्रेस कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात हे दोन्ही नेते बोलत होते.

यावेळी खासदार विशाल पाटीलम्हणाले की, आपण भाजपाचा पराभव करू शकतो, धनशक्तीचा पराभव करू शकतो. या जातीवादी लोकांचा पराभव करू शकतो हे सांगलीतून कळालं. मिरज शहरातील सर्व समाजाने धाडसाने पुढे येऊन मतदान केले आहे. लिंगायत, मराठा, धनगर समाजाने आपल्याला मतदान केले. मनोज जरांगे पाटलांना जी वाईट वागणूक या सरकारने केली त्यामुळे मराठा समाजाने भाजपाला बदला घेतला. देवेंद्र फडणवीस यांनी मराठा समाजाची फसवणूक केली असा आरोप त्यांनी केला.तसेच महाराष्ट्रात आपल्याला काँग्रेसचं सरकार आणायचं आहे. आपण एक झालो आहोत. आपल्याला अहोरात्र एक होऊन काम करायला लागणार आहे. प्रत्येक मतदारसंघात, तालुक्यात संपर्क कार्यालय उघडून लोकांची कामे करायची आहेत. काँग्रेसचा पुरोगामी विचार लोकांपर्यंत पोहचवायचे आहेत. आगामी विधानसभेत सांगली जिल्ह्यातील ४-५ आमदार काँग्रेसचे निवडून देऊ असं आवाहन खासदार विशाल पाटील यांनी केले. पुढचा मुख्यमंत्री काँग्रेसचा असेल हे नक्की सांगली जिल्ह्यात विकासाच्या नावाखाली सर्वसामान्य लोकांना फसवण्यात आले. मिरज शहरातील लोकांना फसवण्यात आले. हे माणसं विसरली नाहीत. त्यामुळे येणाऱ्या काळात सर्व ताकदीने मतभेद विसरून आपल्याला एक दिलाने काम करायचे आहे. विशालराव, येणाऱ्या काळात महाराष्ट्राला नवा मुख्यमंत्री मिळेल. तो सांगली जिल्ह्याचा असेल की नाही हा येणारा काळ ठरवेल पण काँग्रेस पक्षाचा नक्की असेल असा विश्वास आमदार विश्वजित कदम यांनी व्यक्त केला.सांगलीत काँग्रेस-राष्ट्रवादीने काम केले नाही.

दरम्यान, लोकसभा निवडणुकीत शरद पवारांचा स्ट्राईक रेट सगळ्यात चांगला आहे. आम्ही २१ जागा लढलो, सांगलीत काँग्रेस-राष्ट्रवादीनेही आमचे काम केले नाही. त्यामुळे प्रत्यक्षात २० जागांवर आम्ही लढलो असा आरोप खासदार संजय राऊत यांनी केला आहे. सांगली लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीकडून ठाकरे गटाचे चंद्रहार पाटील निवडणुकीला उभे होते. परंतु त्याठिकाणी काँग्रेस बंडखोर विशाल पाटील यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल करत निवडणुकीत बाजी मारली. विशाल पाटील यांनी खासदार म्हणून निवडून येताच काँग्रेसला पाठिंबा दिला.

## राणीच्या बागेत मे महिन्यात पर्यटकांची रेकॉर्ड ब्रेक गर्दी

**मुंबई** : मुंबईतीलआबालवृद्धांचे आकर्षणाचे केंद्र असलेल्या भायखळा येथील वीरमाता जिजाबाई भोसले उद्यान व प्राणिसंग्रहालयाला (राणीची बाग) मे महिन्याच्या सुटीत तीन लाखांहून अधिक पर्यटकांनी भेट दिली. २०२४ मधील या बागेतील ही पहिली रेकॉर्डब्रेक गर्दी ठरली असून, पालिका प्रशासनाला एक कोटीहून अधिक रुपयांचे उत्पन्न मिळाले आहे.

कोरोना व टाळेबंदीमुळे बराच काळ राणीची बाग बंद होती. या बागेचे नूतनीकरण करून येथे विविध पक्षी, प्राणी आणण्यात आले आहेत. या बागेत २८३ प्रजातींचे आणि ६६११ वृक्ष-वनस्पती आहेत. तर रंगीत करकोचा, छत्रबलाक, विविध प्रकारचे आकर्षणाचे केंद्र असलेल्या बगळे, सारस असे पाणथळ पक्षीही आहेत. त्यामुळे या बागेला मुंबईतीलच नव्हे, तर देश-विदेशातील पर्यटक भेट देतात. दररोज ६ ते ७ हजार पर्यटक या बागेत येतात. शनिवार, रविवार या सुटीच्या दिवशी पर्यटकांची संख्या २१ हजारांपर्यंत पोहोचते.

**ऑनलाइन बुकिंगला पसंती-**

१) सध्या या बागेत प्रवेशासाठी लहान मुलांना २५ रुपये, प्रौढांना ५० रुपये तर कौटुंबिक सहलींना एकत्रित १०० रुपये असे शुल्क आहे. प्राण्यांच्या विविध आकर्षणामुळे पर्यटक संख्या आणि महसूल दोन्हींमध्ये वाढ होत आहे.२) सुटीच्या दिवशी पर्यटक राणीची बाग पाहण्यासाठी येत आहेत. विशेष करून सणांमध्ये घरी आलेल्या पाहुण्यांना घेऊन मुंबईकर येथे येत आहेत. ऑनलाइन बुकिंगला पर्यटक अधिक पसंती देत असल्याचे पाहायला मिळत आहे.

## हद्दवाढीचा आदेश न आणल्यास मुख्यमंत्र्यांना कोल्हापूर बंद?

**कोल्हापूर** : शहराच्या हद्दवाढीचा आदेश न आणल्यास मुख्यमंत्रीएकनाथ शिंदे यांना कोल्हापूर बंद करायचे की काळे झेडे दाखवायचे यावर चर्चा करून निर्णय घेण्यासाठी उद्या रविवारी कोल्हापूर शहर हद्दवाढ कृती व समन्वय समितीच्यावतीने बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

महाराणा प्रताप चौकात सायंकाळी ५ वाजता होणाऱ्या या बैठकीसाठी कार्यकर्त्यांनी उपस्थित रहावे असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शहराध्यक्ष आर. के. पोवार, ॲड. बाबा इंदूलकर आणि बाबा पार्टे यांनी केले आहे.

सन १९४६ पासून कोल्हापूरची हद्दवाढ झालेली नाही. जानेवारी २०२१ मध्ये शिंदे हे नगरविकास मंत्री असताना कोल्हापूरला आले होते. त्यावेळी त्यांची भेट घेतली असता त्यांनी हद्दवाढीचा प्रस्ताव मागवून



घेतला होता. परंतू याबाबत काहीही निर्णय झाला नाही. यानंतर समितीने अनेकवेळा तत्कालिन पालकमंत्री दीपक केसरकर यांच्याशी चर्चा केली.

'विषय नवीन आहे. मी समजून घेतो. वेळ पडली तरी २० गावात फिरून मी त्यांची समजूत काढेन' असे आश्वासन केसरकर यांनी दिले होते. परंतू नंतर ते फिरकलेच नाहीत आणि नंतर त्यांचे पदही गेले. १५ ऑगस्ट २०२३ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील ध्वजवंदनानंतर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही हद्दवाढीची गरज स्पष्ट केली होती.

मात्र प्रस्ताव देवून चार वर्षे झाली, शिंदे नगरविकास खात्यापासून मुख्यमंत्री झाले तरीही एका इंचाने कोल्हापूरची हद्द वाढली नाही. त्यामुळेच त्यांच्या २७ जूनच्या कोल्हापूर दौऱ्यावेळी त्यांना कोल्हापूर बंद करायचे की काळे झेंडे दाखवून निषेध करायचा यावर चर्चा करण्यासाठी या उद्याच्या बैठकीत चर्चा होणार असल्याचे प्रसिध्दीपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

## संपादकीय

# निकाल येईल पुढे 'नीट' होईल



नीटच्या निकालानंतर देशभर सुरू झालेला गोंधळ विद्यार्थ्यांचा तणाव वाढविणारा आहे. न्यायालयाच्या निकालाने पालक, विद्यार्थ्यांचे समाधान होईल आणि प्रश्न सुटेल अशी अपेक्षा आहे. त्यानंतर पुढच्या परीक्षा कशा होणार, जे घडले त्यातून एनटीए (नॅशनल टेस्टिंग एजन्सी) कोणता धडा घेणार, हा खरा प्रश्न आहे. नीट परीक्षा व्यवस्थेच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांच्या मनात मूलभूत प्रश्न आहेत. ग्रेस गुणांची समस्या निकाली निघाली. त्या १,५६३ विद्यार्थ्यांनापुन्हा परीक्षा अथवा मूळ गुण स्वीकारण्याचा पर्याय देण्यात आला आहे. आता वेगवेगळ्या राज्यांत पेपरफुटीची झालेली चर्चा आणि तपास यंत्रणांनी दिलेली माहिती अस्वस्थ करणारी आहे.

देशभरात २३ लाखांहून अधिक विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांचा जीव कासावीस झाला आहे. घराघरांत तणाव आहे. गडबडीची व्याप्ती किती खोलवर आहे, त्यावर नीटची परीक्षा पुन्हा होणार का? आणि होणार तर कोठे होणार? याचे उत्तर लवकरच मिळेल. बिहार, गुजरात, हरियाणा, जिथे जिथे गडबडीचा संशय आहे, तेथील केंद्रात, त्या-त्या राज्यापुरती की संपूर्ण देशभर पुन्हा परीक्षा यावर स्पष्टता होईल, तोवर विद्यार्थ्यांना पालकांनी, शिक्षकांनी धीर दिला पाहिजे. मार्ग निघेल, प्रश्न सुटेल, असा विश्वास निर्माण केला पाहिजे.प्रत्येक विद्यार्थ्याकडे संशयाने बघू नयेया वर्षीचा निकाल तुलनेने अधिक चांगला का आला, त्यावर प्रथमतः ग्रेस गुणांची चर्चा झाली. परंतु, तो मुद्दा मर्यादित विद्यार्थ्यांपुरता होता. काहीजणांनी प्रामाणिकपणे अभ्यास करून चांगले गुण मिळविले! याशिवाय, एनटीएने २० टक्के अभ्यासक्रमाची कपात केली.त्यामुळे ८० टक्के अभ्यास पूर्ण करणाऱ्या हुशार विद्यार्थ्यांची संख्या वाढली का? हेही तपासले पाहिजे.त्यामुळे चांगले गुण मिळविणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याकडे संशयाने बघता येणार नाही.विद्यार्थ्यांच्या आयुष्याशी खेळू नका...

विद्यार्थ्यांच्या आयुष्याशी पुन्हा खेळ होणार नाही. याची हमी दिली पाहिजे. परंत नीट नकोच अशी भूमिका आततायी- पणाची ठरेल. नीटमुळे महाराष्ट्रातील विद्यार्थी देशपातळीवर गुणवत्ता सिद्ध करू शकले. एम्ससारख्या संस्थांमध्ये प्रवेशाचा टक्का वाढला. स्पर्धात्मक वातावरण निर्माण झाले. यंत्रणेतील दोष दूर करणे आणि गुणवत्तेवर आपल्या जागा काबीज करणे ही आपली भूमिका असली पाहिजे.

महाराष्ट्रात पावणेतीन लाख विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. त्यात शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात जवळपास ४ हजार ९५० आणि खासगी महाविद्यालयामध्ये ३ हजार एमबीबीएसच्या जागा आहेत. सुमारे ७ हजार ९५० विद्यार्थ्यांना एमबीबीएसला प्रवेश मिळेल. त्यानंतर बीएमएस, बीडीएस, फिजिओथेरपीचे प्रवेश होतील. ज्याच्या-त्याच्या गुणवत्तेनुसार व अपेक्षेप्रमाणे प्रवेश मिळविणारे विद्यार्थी काही हजारामध्ये असतील.-स्वाभाविकच ज्यांना नीट २०२५ ची प्रतीक्षा करावी लागणार आहे. अशा विद्यार्थ्यांची संख्या लाखोमध्ये आहे. त्यामुळे पुन्हा परीक्षेची मागणी तीव्र दिसते. त्याच वेळी ज्यांनी प्रामाणिकपणे अभ्यास करुन परीक्षा दिली आहे. त्यांच्यासाठी अभ्यासाची उजळणी आणि तीच परीक्षा देणे जीवावर येऊ शकते. त्यामुळे दोन्ही बाजूने विद्यार्थी तणावात आहेत.निकालानंतर पुढे काय होणार...

न्यायालय न्याय देईल, नीट-२०२४ च्या निकालाचा संभ्रमही दूर होईल आणि नीट- २०२५ ची तयारी सुरू होईल. मात्र जे घडले त्यातून एनटीए कोणता धडा घेणार आणि सुधारणा काय करणार हे अधिक महत्वाचे आहे. त्यासाठी शिक्षकांनी, अभ्यासकांनी योग्य पर्यायसुचविले पाहिजेत. दोन महत्वाचे बदल करता येतील. विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्र निवडीचे स्वातंत्र्यदिले आहे. त्यावर मर्यादा आणावी.-दहावी, बारावी कोठून झाली अथवा त्याचारहिवास कुठला आहे याचा विचार करून त्या जिल्ह्यातील, विभागातीलच केंद्र निवडता यावे. कारण महाराष्ट्राचे विद्यार्थी कर्नाटक, गुजरा- तमध्ये जाऊन परीक्षा देत असतील तर गडबडीचा संशय येणारच, खासगी संस्था, व्यक्तीवर जबाबदारी न सोपविता, केंद्राची जबाबदारी वरिष्ठ शासकीय अधिकायांकडे आणि परीक्षा हॉलवर शासकीय, निमशासकीयच कर्मचारी नियुक्त करावेत.

# पाटण शहराला दोन दिवस पाणीपुरवठा बंद

## नागरिकांचे हाल

**पाटण :** पाटण शहरात दोन दिवसांपासून पाणीपुरवठा होवू न शकल्याने शहरातील नागरीकांवर ऐन पावसाळ्यात पैसे खर्च करून पिण्याचे पाणी टँकरने विकत घेण्याची वेळ आली आहे. सतत शहरातील पिण्याच्या पाण्याच्या टंचाईमुळे व पाणीपुरवठा बंद असल्याबाबत नगरपंचायतीकडून कोणतीही पूर्व कल्पना न दिल्याने नागरीकांमधून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. पाटण शहरावरील पाणी टंचाईचे सावट कधी जाणार? असा सवाल नागरीक विचारत आहेत.

पाटण शहरात पिण्याच्या पाण्याची टंचाई नेहमीच पहायला मिळते. कधी पाणी सोडण्यासाठी कर्मचारी जात नाहीत, कधी पाईपलाईन फुटते, कधी मोटार बिघडते, अशा विविध कारणामुळे शहरातील पाणीपुरवठा या ना त्या कारणाने बंद होत असतो. अनेक वर्षापासूनची जुनी पाणीपुरवठा योजना असल्याने सतत या योजनेत अडथळे निर्माण होत आहेत. शहरासाठी नवीन चोवीस बाय सात पाणी योजना मंजूर झाली आहे, त्याचे काम लवकरच सुरू होईल, हे गेल्या पाच ते सहा वर्षांपासून पाटणमधील जनता ऐकत आली आहे. मात्र चोवीस बाय सात योजनेचे काम सोडा, साधा शहराचा पाणीपुरवठा पाटण नगरपंचायतीला सुरळीत करता आला नाही. सध्या गेल्या दोन दिवसांपासून पाटण शहरातील पाणी पुरवठा बंद आहे. कोयना नदीचे पाणी गढूळ असल्याने ते पिण्या योग्य नाही. त्यामुळे शहरातील नागरीकांना ३०० ते ४०० रुपये खर्च करून पिण्याचे पाणी टँकरद्वारे मागवावे लागत आहे. याशिवाय पाटण नगरपंचायतीकडून नागरीकांना पाणी येणार नसल्याबाबत कोणत्याही प्रकारची पूर्वकल्पना न दिल्याने नागरीकांमधून संताप व्यक्त केला जात आहे. याबाबत नगरपंचायतीच्या नगरसेवकांशी संपर्क साधला असता, पाटण शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या फिल्ट्रेशन टाकी साफसफाईचे काम सुरू आहे. त्याचबरोबर पाईपलाईन व वाळू बदलण्याचे काम सुरू असल्याने दोन दिवसांपासून पाणीपुरवठा बंद असल्याचे सांगण्यात आले. खरे तर पाणी पुरवठा करणाऱ्या टाक्यांची स्वच्छता उन्हाळ्यात करणे अपेक्षित होते. मात्र ऐन पावसाळ्यात हे काम काढल्याने विनाकारण शहरातील नागरीकांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे. त्यामुळे नागरीकांनी संताप व्यक्त केला आहे.

# आग रामेश्वरी, बंब सोमेश्वरी, ...अवैध दारुविक्रीत अकार्यक्षमता

## नांदगाव पोलीस स्टेशनच्या एकसुत्री कारभाराला 'लगाम' लागणार का...?

**उंडाळे :** जिल्हाचा पोलीस अधिक्षक म्हणुन समिर शेख यांनी पदभार स्विकारल्यानंतर सातारासह कराडमध्ये कामाचा धडाका चालु केला आहे. अवैध व्यवसाय व व्यवसायिकाची पोळेमुळे ओळखुन मुळावर घाव घालत बहुतांश अवैध व्यवसाय बंद करण्यात आले आहेत. तर सातारा जिल्हातील शहर व परिसरातीत अवैध धंदावर कारवाईचा धडाका सुरु असल्यामुळे अवैध व्यवसायिकाचे समुह उच्चाटन झाल्याचे दिसुन येत आहे तर दुसरीकडे जिल्हातील कराड दक्षिणच्या ग्रामीण भागात नांदगाव पोलीस स्टेशनमध्ये कार्यरत असण्या-या अधिकारा-याच्या अधिकार क्षेत्रात मात्र कायदा सुव्यवस्थेचा सुकाळ असल्याने उघड-उघड रस्त्यालगत 'हिरव्या शेडनेड'च्या आडुन अवैध व बनावट दारुविक्री सुरु असुनही नांदगाव पोलिसांची 'कार्यतत्परता दिसुन येत नसल्याने आग रामेश्र्वरी, बंब सोमेश्वरी परिस्थिती दिसुन येत आहे.

नवा गडी नवे राज्य या उक्तीप्रमाणे नांदगाव पोलीस स्टेशनमध्ये रुजु झालेल्या कार्यतत्पर पोलीस अधिकारी, कर्मचारी अवैध दारुविक्री, गांजा विक्री, गुटखा विक्री, व अवैध वाहतुकीवर कारवाई करण्यात 'सपशेल अपयशी' ठरतायहेत का..?या चालु असणाऱ्या अवैध धंदाकडे' जाणिवपूर्वक' दुर्लक्ष करत वरिष्ठांना 'आँल ईज वेल' ची भाषा करत दिशाभूल करत आहेत का..? असा प्रश्न स्थानिकामधुन उपस्थित होत आहे.

नांदगाव पोलीस स्टेशनच्या हद्दिमध्ये येणाऱ्या या अवैध धंदे व अवैध व्यवसायातुन 'गब्बर' झालेल्या व्यवसायिकाच्या विरोधात समाज माध्यमातून वेळोवेळी प्रश्न उपस्थित होवुन ही, पाचवड फाटा,कालेटेक, व ओंड हद्दितील ढाबा वजा ओपन विना परवानाबार सारखी परिस्थिती असुन ही नांदगाव पोलीस स्टेशनच्या अंतर्गत 'कार्यतत्पर' अधिकारी, कर्मचारी नक्की काय करत आहेत हे ही वरिष्ठ विभागाकडुन शोध घेण्याची मागणी होवु लागली आहे.

या परिसरातील होत असलेल्या बहुतांश अवैध व्यवसायाना कोण..? 'खत-पाणी' घालण्याचा प्रयत्न करत ,आहेत याचा वेळीच शोध घेवुन वर्षानुवर्षे बोथट झालेल्यांची अवस्था 'निदान' वरिष्ठ विभागाकडुन होईल काय..?असा प्रश्न उपस्थित होत आहे. कायदा व सुव्यवस्था आहे का...? हा प्रश्न निर्माण होतो कारण रस्तालगत जागोजागी उघड्यावर दारुविक्री या धंदाना पुरवण्यात येणारा दारुसाठा व वाहतुक कोणाच्या संगनमताने सूरु आहे हे सर्वश्रुत असुन अवैध वडाप, गांजाविक्री, हे दक्षिणच्या याच 'प्रतिभाशिल' हद्दिमध्ये राजरोसपणे होताना दिसुन येत आहे.

आपल्या कामाच्या कार्यपध्दतीने अल्पावधीत वाहवा मिळवुन कायदा सुव्यवस्था निर्माण करण्यास आरंभ केलेले सातारा जिल्ह्यातील एसपी साहेब..ना कराड दक्षिणेतील एका औट पोस्ट अंतर्गत सुरु असणाऱ्या अवैध व्यवसायास व या व्यवसायिकांना पाठिशी घालणा-या कायद्याच्या 'चाकोरी'त आणण्यात किती यशस्वी ठरताहेत..हेच पाहणे औचित्याचे ठरुन, राजरोस सुरु असणाऱ्या अवैध दारुविक्री, वाहतुकीवर 'भारदस्त' कारवाई करण्यासाठी दक्षिणेतेल सर्वसामान्याकडुन साद घालु लागल्याचे दिसुन येत आहेत.

'हिरव्या शेडनेट',च्या कंपाऊंडचं,रहस्य काय..?

कराड-चांदोली मार्गावरील याच औट पोस्टच्या अंतर्गत येणाऱ्या गावांच्या हद्दीमध्ये रस्त्यालगत असणाऱ्या शेड व जिर्ण ढाबा भोवती हिरव्या शेडनेट,आड कोणता व्यवसाय 'राजरोस' सुरु आहे हे सर्वश्रुत असुन कागदोपत्री कारवाई करुनही त्याच्या दुस-या दिवशी,कारवाई ची भरपाई करण्यासाठी 'सकाळी ६ वाजल्यापासून दुचाकीच्या रांगा कशासाठी दिसुन येतात..! असा प्रश्न उपस्थित होतो.

# मत्स्योद्योग विकास धोरण निश्चित करणारी गठित समिती कागदावरच?

## आठ महिन्यांपसून साधी बैठकही नाही

**मुंबई :** महाराष्ट्रात वस्त्रोद्योग विभागाचे वस्त्रोद्योग धोरण तर उद्योग विभागाचे औद्योगिक धोरण त्या धर्तीवर भूजलाशाचे आणि सागरी जिल्ह्यात, मत्स्योद्योग विकास धोरण निश्चित करण्यासाठी समिती गठित करण्याचा निर्णय घेत राज्य सरकारन गेल्या वर्षी शासन निर्णय काढला होता. मात्र, तब्बल आठ महिने उलटून गेल्यानंतरही कोणत्या प्रकारची बैठक या समितीची झाली नसल्यामुळने शासनाने गठित केलेली समिती फक्त कागदावरच राहिली का? अशा प्रकारचा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

भूजलाशयाचे आणि सागरी जिल्ह्यांतील मत्स्योद्योग विकास धोरण निश्चित करण्यासाठी २४ ऑगस्ट २०२३ रोजी १८ जणांचा सामावेश असलेली एक समिती गठित करण्यात आली. समितीच्या अध्यक्षपदी उत्तर प्रदेशचे माजी राज्यपाल राम नाईक यांची नियुक्ती करण्यात आली. मात्र गेल्या आठ महिन्यांपासून समितीनं कोणतीही बैठक बोलावलेली नाही. त्यामुळं सदर समिती कागदावरच राहिली का, अशा प्रकारचा प्रश्न उपस्थित केला जात आहे. मानवी आरोग्यासाठी घातक आणि स्थानिक प्रजातींचे मासे नष्ट करणाऱ्या मांगूर मासे संवर्धन मोठ्या प्रमाणावर बेकायदा सुरू असल्याचे निदर्शनास येत आहे. १८८ आयपीसी अंतर्गत मांगूर मासे संवर्धन करणाऱ्यांवर कारवाई होत असते. यात कुठल्याही शिक्षेची तरतूद नाही. फक्त दंडात्म क किंवा समज देऊन कारवाई केली जाते. याचा फायदा मांगूर मासे बेकायदेशीरपणे संवर्धन करणारे घेत असल्याचे जाणकार सांगतात. तसंच या समितीने गेल्या आठ महिन्यात एकही बैठक घेतली नाही.

वन्यजीव संरक्षणासाठी ज्या प्रकारे आपल्याकडे कायदा अस्तित्वात आहे. तशा प्रकारे जलजीवन संरक्षणासाठी कायदा करण्याची आवश्यकता असल्याचे मत्स्य विभाग आयुक्त अतुल पाटणे यांनी म्हटले आहे. यामध्ये सगळ्याच प्रकारचे जलजीव येतात. मात्र, मांगूरच्या बाबतीत वेगळी गोष्ट आहे. मांगूर ज्या तलावात असतो त्या तलावातील सर्वच जलजीव तो खाऊन टाकतो. आपल्याकडे आढळणाऱ्या सर्व माशांच्या प्रजाती मांगूर मासा खाऊन नष्ट करतात. भारतात प्रतिबंधित असलेला मांगूर मासा वाढ लवकर होत असल्यामुळे लवकरात लवकर उत्पन्न मिळून पैसा कमवण्याच्या उद्देशाने मांगूर मासा संवर्धन केला जातो. आमच्या विभागाला माहिती मिळताच मांगूर मासा विक्री आणि संवर्धन करणाऱ्यांवर कारवाई केली जात असते. आताच आम्ही १५ संवर्धन करणाऱ्यांवर कारवाई करुन ३०० टन मांगूर मासा नष्ट केला आहे. गोड्या पाण्याबाबतच्या कायद्यात काही तरतुदीत वाढ करण्याची आवश्यकता आहे. बांगलादेश आणि पश्चिम बंगालमध्ये मांगूरचे प्रामुख्याने उत्पादन होत असते. तिथून हा वेगवेगळ्या मार्गाने इतर भागात येत असतो. मात्र बांगलादेशमध्ये हा मासा प्रतिबंधित नाही. त्यामुळे तिथून तो कायदेशीर येत असतो. त्यावर आपल्याला कारवाई करता येत नाही. म्हणून वाइल्ड ऍक्ट वन्यजीव संरक्षण कायदा प्रमाणे जर कारवाई केली तर आपण पुरवठादारांपर्यंत पोहोचून प्रतिबंधित करू शकतो, असेही अतुल पाटणे यांनी म्हटले. राज्यातील काही भागात प्रतिबंधित मांगूर माशाचे आडमार्गाने संवर्धन केले जात आहे. संवर्धन आणि विक्री करणाऱ्यांवर सामाजिक कार्यकर्ते प्रशांत वाघमारे यांनी कारवाई करण्याची मागणी केली आहे. अनेक ठिकाणी बेकायदेशीरपणे मांगूर माशाचे संवर्धन होत आहे. त्यामुळे हे मासे खाल्ले तर त्याचा परिणाम मानवी शरीरावर होऊ शकतो. सरकारने या मागणीकडे लक्ष द्यावे असे वाघमारे यांनी म्हटले.

# ...तर विधानसभा, लोकसभेतही आम्हाला आरक्षण हवे

**जालना :** गेल्या दहा दिवसांपासून जालन्यातील वडीगोद्री येथे मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण नको, या म ागणीसाठी ओबीसी नेते लक्ष्मण हाके आणि नवनाथ वाघमारे यांचे उपोषण सुरु होते. मंत्री छगन भुजबळ यांच्या नेतृत्वातील शिष्टमंडळाने आज हाके आणि वाघमारे यांची भेट घेत उपोषण मागे घेण्याची विनंती केली. राज्य सरकारच्या शिष्टमंडळाने दिलेल्या आश्वासनानंतर लक्ष्मण हाके आणि नवनाथ वाघमारे यांनी आपले उपोषण मागे घेतले. यावेळी मंत्री छगन भुजबळ यांनी भाषण करताना राजकीय आरक्षणाची मागणी केली आहे.

छगन भुजबळ म्हणाले की, आम्ही कुणालाही धमक्या देत नाही. आपली लढाई अजून संपलेली नाही. त्यांना दुसरे ताट द्या, आमच्या ताटातले देऊ नका. लोकशक्ती एकत्र आली तर धनशक्तीचा पराभव होईल. त्यांना स्वतंत्र आरक्षण द्या आम्ही पाठींबा देतो.

आरक्षण हा गरिबी हटावचा कार्यक्रम नाही. अन्याय झालेले समाज हळूहळू पुढे यावे, यासाठी आरक्षण आहे, असे त्यांनी म्हटले.

ते पुढे म्हणाले की, लोकसभा निवडणुकीत पंकजा मुंडेंना पाडले. पंकजाताईंनी सम ाजात तेढ नको म्हणून कोणाला विरोध केला नाही. तरीही काही लोकांनी त्यांना विरोध केला. सगळ्यांनी मिळून त्यांच्या पराभवाचे कारस्थान रचले. आम्ही लोकसभेवर जायचे नाही, विधानसभेवर जायचे नाही.

जर असेच सुरु राहिले तर विधानसभा आणि लोकसभेतही आम्हाला आरक्षण हवे, अशी मागणी करावी लागेल. लढाई अजून संपलेली नाही. तर ती सुरु झाली आहे. त्यामुळे आता घरी बसून चालणार नाही.

आपल्या हक्कांसाठी वणवा पेटवावा लागेल, असे त्यांनी म्हटले. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा जातनिहाय जनगणनेला पाठींबा असल्याचेही छगन भुजबळ यांनी म्हटले आहे.

# बिद्री सहकारी साखर कारखान्याच्या डिस्टलरी प्रकल्पाची तपासणी

**कोल्हापूर :** सत्ताधारी पक्षातील माजी आमदार के. पी. पाटील चेअरमन असलेल्या दूधगंगा वेदगंगा अर्थात बिद्री सहकारी साखर कारखान्याच्या डिस्टलरी प्रकल्पाची राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून तपासणी करण्यात येत आहे. महायुतीत असलेले केपी पाटील महाविकास आघाडीच्या वाटेवर असल्याच्या चर्चा सुरू असतानाच हे तपासणीसत्र सुरु झाल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासोबत असलेले माजी आमदार कृष्णरावी पाटील उर्फ के. पी. पाटील हे दूधगंगा वेदगंगा अर्थात बिद्री सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष आहेत. या डिस्टलरी प्रकल्पाची राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून तपासणी करण्यात येत आहे. या अजब राजकीय योगायोगाची राज्याच्या राजकारणात चर्चा सुरु झाली आहे.

राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पुणे कार्यालयाच्या पथकाने झडती घेतली. अचानक आलेल्या पथकाने रात्रभर तपासणी केली. प्रकल्पात असलेल्या त्रुटींच्या बाबत तपासणी झाल्याची प्राथमिक माहिती आहे.

उत्पादन शुल्क विभागाकडून करण्यात आलेल्या तपासणी बाबत प्रचंड गोपनीयता पाळण्यात आली होती. विशेष म्हणजे, सध्या महायुतीत असलेले राष्ट्रवादीचे माजी आमदार के. पी. पाटील महाविकास आघाडीच्या वाटेवर असल्याच्या चर्चा सुरू आहेत. अशातच कारखान्यावर झालेल्या तपासणीमुळे चर्चांना उधाण आले आहे.

# कोकण, विदर्भासह मराठवाड्याला पावसाने झोडपले

## मुंबईकरांना मात्र पावसाची प्रतीक्षा

**मुंबई :** राज्यात विविध भागात पावसाची हजेरी पाहायला मिळत आहे. ठाण्यात पहाटेपासूनच मुसळधार पावसाला सुरुवात झाली, त्यामुळे कामगार वर्गाचे हाल झाले. मुंबईकरांना मात्र, अद्याप पावसाची प्रतीक्षा कायम आहे. मुंबईत तुरळक ठिकाणे वगळता गेल्या चार दिवसांपासून पाऊस दडी मारुन बसला आहे. ठिकठिकाणी पाणी साचण्यास सुरुवात झाली. पावसाळ्यामुळे वाहतूक धिम्या गतीने सुरु होती. वंदना डेपो परिसरात पाणी साचायला सुरुवात झाली. शुक्रवारी दिवसभराच्या विश्रांतीनंतर आज पालघरमध्ये पुन्हा एकदा मुसळधार पाऊस सुरू झाला. पहाटेपासूनच पालघर, बोईसर परिसरात मुसळधार पाऊस पाहायला मिळाला. भात पेरणी केलेल्या शेतकऱ्यांना पावसामुळे मोठा दिलासा मिळाला आहे. शेतकऱ्यांची शेतीच्या कामाची लगबग सुरू झाली आहे.

अनेक दिवसांच्या विश्रांतीनंतर परभणी शहरासह जिल्ह्यात दमदार पावसाने हजेरी लावली आहे. वादळी वारे,विजांचा गडगडाट आणि जोरदार पाऊस परभणीत झाला आहे. यामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असून खोळंबल्या पेरण्यांना आता गती येण्याची चिन्हे निर्माण झाली आहेत. सर्वसामान्य परभणीकरांनाही उकाड्यापासून काहीशी मुक्ती मिळालीय. जोरदार पाऊस बरसल्याने वातावरणही थंड झाले आहे. बुलढाणा जिल्ह्यातील अनेक भागात सकाळपासून पावसाची रिपरिप सुरु आहे. खामगाव, शेगाव, संग्रामपूर परिसरात दमदार पाऊस तर इतर भागात हलका ते मध्यम पाऊस सुरू आहे. वाशिम जिल्ह्यात काही भागात तीन ते चार दिवसापासून दडी मारलेल्या पावसाने जिल्ह्यात काही ठिकाणी रात्री जोरदार हजेरी लावली. त्यामुळे शेतकऱ्यांना काही प्रमाणात का होईना दिलासा मिळाला तर, दुबार पेरणीचे संकट टळणार आहे. जिल्ह्यात मोठ्या पावसाची प्रतीक्षा कायम आहे.

अखेर मान्सून नागपुरात दाखल झाला आहे. नागपूरसह मान्सून पूर्व विदर्भात दाखल झाल्याची घोषणा हवामान खात्याकडून करण्यात आली आहे. नागपुरात १६ जूनपर्यत मान्सून दाखल होण्याच अंदाज होता, मात्र ५ दिवसांच्या विलंबाने मान्सून दाखल झाला आहे. केरळनंतर कोकण किनारपट्टीसह पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाड्याच्या बहुतेक भागात मान्सून सुमारे यापूर्वीच दाखल झाला होता. मात्र पूर्व विदर्भातील नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोलीत मान्सून पोहोचला नव्हता. मान्सून अभावी वातावरणात उकाडा जाणवत असून शेतातील पेरण्याही खोळंबल्या. बंगालच्या उपसागरात तसेच अरबी समुद्रात चक्रीवादळ निर्माण झाल्याने मान्सूनच्या ढगांनी जोर पकडला. शुक्रवारी संध्याकाळी तासभर पडलेल्या मुसळधार पावसाने नागरिकांना दिलासा मिळाला. पुढील तीन ते चार दिवस नागपुरात चांगला पाऊस पडण्याचा हवामान विभागाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट क्र. ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ करिता साहस प्रिंट्स, ६७/बी, रामनगर, पवार कॉलनी, शाहूपुरी, सातारा येथे छापून राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट नंबर ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ येथे प्रसिद्ध केले. संपादक : नरेश विठ्ठल देसाई, दूरध्वनी - ९८३४६८७३६४, ईमेल - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: M-HM-R17902

Printed and Published by Naresh Vitthal Desai on behalf of Rajdand Media Private Limited Plot no. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002 and Printed at Sahash Prints 67/B, Ramnagar, Pawar Colony, Shahupuri, Satara 415002 and Published at Rajdand Media Private Limited Plot No. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002. Editor : Naresh Vitthal Desai, Phone - 9834687364, Email - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: M-HM-R17902

# ...त्यांना पुन्हा उपोषणाला बसण्याची वेळ येणार नाही : पंकजा मुंडे



**मुंबई :** लक्ष्मण हाके आणि नवनाथ वाघमारे यांनी उपोषण स्थगित केल्याबद्दल त्यांचे अभिनंदन व्यक्त करून सरकार त्यांच्या मागण्यांचा नक्कीच सकारात्मक विचार करेल. तसेच त्यांना पुन्हा उपोषणाला बसण्याची वेळ येणार नाही, अशी प्रतिक्रिया भाजपाच्या नेत्या पंकजा मुंडे यांनी दिली. आज भाजपा कार्यालयात आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेला पंकजा मुंडे यांनी ओबीसी आणि मराठा आरक्षणावर भाष्य केले. जर बोगस कुणबी प्रमाणपत्र दिले गेले असेल तर ते रद्द केले पाहीजे, अशी मागणी हाके यांनी केली होती, या मागणीलाही पंकजा मुंडे यांनी पाठिंबा दिला आहे.

ओबीसी आरक्षणासाठी उपोषण करणाऱ्या प्रा. लक्ष्मण हाकेंची भाषा, त्यांचे बोलणे, त्यांचे विचार मांडणे, हे सर्व मुद्द्याला धरून आहे. कुणाला ललकारणे, कुणाची बघू म्हणणे किंवा बाह्या सरसावणे ही त्यांची भूमिका नाही. त्यामुळे त्यांचे सालस आंदोलन माझ्यासह सर्वांना भावले, अशीही प्रतिक्रिया पंकजा मुंडे यांनी दिली. तसेच हाके आणि वाघमारे यांनी एक प्रतिष्ठा ठेवून त्यांचे मुद्दे मांडल्यामुळे त्यांच्याकडे लक्ष दिले गेले, बाकी कुणी काही बोलत असेल तर त्याकडे लक्ष देण्याची गरज नाही, असे सांगून पंकजा मुंडे यांनी मनोज जरांगे पाटील यांना अप्रत्यक्ष टोला लगावला.

ओबीसी आणि मराठा पूर्वी बहुजन होते. पण आता ओबीसी आणि मराठा भांडण लावण्याचे कारस्थान राज्यात यशस्वी होऊ देऊ नये, असे मानणाऱ्या नेत्यांपैकी मी एक आहे. कुठल्याही मंचावर जाऊन दुसऱ्यांना बोलण्याची भूमिका मी घेतलेली नाही. पण आता राज्यातील परिस्थिती विचित्र नक्कीच झाली आहे. यातून राजकीय नेत्यांनी मार्ग काढला पाहीजे. दोन्ही समाजाच्या नेत्यांना एकत्र बसवून त्यांच्यातील वितुष्ट संपविले पाहीजे. शेवटी देशाच्या राज्यघटनेपेक्षा कुणीही मोठा नाही. घटना आणि कायद्यापेक्षा कुणीही आणि कोणताही समाज मोठा नाही, असेही पंकजा मुंडे यांनी सांगितले. गेल्या १० दिवसांपासून ओबीसी आरक्षण संरक्षणार्थ केलेले उपोषण लक्ष्मण हाके यांनी आज स्थगित केले. छगन भुजबळ, धनंजय मुंडे, गिरीश महाजन यांच्यासह राज्य सरकारचे शिष्टमंडळ हे उपोषण सोडविण्यासाठी जालन्याच्या वडीगोद्री येथे पोहोचले होते. मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देऊ नये, या मागणीसाठी प्राध्यापक लक्ष्मण हाके आणि नवनाथ वाघमारे यांनी बेमूदत उपोषणाचे आंदोलन छेडले होते.

# आदर्श शाळांमध्ये समाजाचा सहभाग आवश्यक आहे : याशनी नागराजन

**महाबळेश्वर :** सर्व प्राथमिक शाळा आदर्श करत असताना शासनाबरोबर समाजाचाही सहभाग अत्यंत आवश्यक असलेचे मत सातारा जिल्हा परिषदेच्या मुख्यकार्यकारी अधिकारी याशनी नागराजन यांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मेटगुताड ता.महाबळेश्वर येथे आयोजित आजी-माजी विद्यार्थी शैक्षणिक मेळाव्यात मार्गदर्शन करताना व्यक्त केले.

यावेळी महाबळेश्वर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी अरुण मरभळ, सहा.गटविकास अधिकारी सुनील पारठे, उपअभियंता संजय जाधव, गटशिक्षणाधिकारी आनंद पळसे, शाखा अभियंता संतोष गोरे, सुरेंद्र पारखे, सरपंच महादेव ओंबळे, भिकन बावळेकर, संजय बावळेकर, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष अनिल बावळेकर, विस्तार अधिकारी सुनील चिकणे, कनिष्ठ अभियंता साधना पोरे व सुहास कुलकर्णी आदी मान्यवर उपस्थित होते.

यशनी नागराजन पुढे म्हणाल्या,शाळांच्या भौतिक गरजांच्या पूर्ततेसह शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी शिक्षकांबरोबर समाजातील सर्वच घटकांनी पुढाकार घेवून आपली शाळा आदर्श करणेसाठी प्रयत्न करणे अत्यंत आवश्यक आहे.

प्रारंभी याशनी नागराजन यांनी शालेय विद्यार्थ्यांशी सुसंवाद साधून प्रत्येक विद्यार्थ्यांनी आपापल्या आवडीच्या क्षेत्रात आत्मविश्वासाने मार्गक्रमण करत पुढे जावे तसेच अभ्यासात चिकित्सक व जिज्ञासूवृत्तीने ज्ञानग्रहण करण्याचा मौलिक सल्ला त्यांनी विद्यार्थ्यांना दिला, त्यानंतर तालुक्यातील शिक्षकांनी दूरचित्रप्रणालीच्या माध्यमातून संवाद साधताना महाबळेश्वर तालुक्यातील विविध शैक्षणिक उपक्रमांचे कौतुक करुन शिक्षकांनीही शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी सातारा जिल्हा परिषदेच्या माध्यमातून सध्या सुरु असलेले उपक्रम पूर्ण क्षमतेने आपापल्या शाळांमध्ये राबवावेत असे आवाहन त्यांनी केले आणि प्राथमिक शिक्षकांसाठी सुरु असलेल्या वाचनालयाबाबत गौरवोद्गार काढून सर्वांना पुस्तके वाचणेसाठी प्रोत्साहित केले.

दरम्यान राधाकृपा आश्रम भोसे-भिलार यांचेवतीने तालुक्यातील २५ शाळांना देणेत येणारे एल.सी.डी.दूरदर्शनसंच प्रातिनिधिक स्वरुपात भाऊसाहेब दानवले यांचेमार्फत मेटगुताड शाळेस मुख्यकार्यकारी अधिकारी याशनी नागराजन यांचेहस्ते शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षक यांना सुपूर्द करणेत आला.

सदर मेळाव्याच्या अनुषंगाने गटविकास अधिकारी अरुण मरभळ व गटशिक्षणाधिकारी आनंद पळसे यांनी सर्व उपस्थितांना आदर्श शाळेबाबत मार्गदर्शन करुन लोकसहभाग देणेविषयी आवाहन केले. सर्व उपस्थितांचे स्वागत सुनील भिलारे यांनी केले तर आभार रमेश सरक यांनी मानले तसेच सूत्रसंचालन श्रीगणेश शेंडे यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शंकर पवार, पल्लवी घोडके, वैशाली गुरव,कमल सावंत, स्वाती गावडे यांनी परिश्रम घेतले.

## वारुंजी विकास सोसायटीच्या चेअरमनपदी गणेश पाटील व व्हा. चेअरमनपदी श्रीमती सुनंदा धुमाळ यांची निवड

**कराड :** महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री मा. आमदार पृथ्वीराज चव्हाण (बाबा) व प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस मा. अँड. उदयसिंह पाटील(दादा) यांच्या नेतृत्वाखाली तसेच माजी पंचायत समिती सदस्य मा. नामदेव पाटील (आप्पा) व बाजार समिती उपसभापती मा.संभाजी चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली, वारुंजी वि.का.स. सोसायटीच्या संचालक मंडळाची चेअरमन व व्हाँ. चेअरमन निवडीसाठी सभा पार पडली. श्री. गणेश बाबासो पाटील यांची चेअरमनपदी तर श्रीमती सुनंदा रमेश धुमाळ यांची व्हाँ. चेअरमनपदी निवड झाली.नवनिर्वाचीत चेअरमन व व्हाँ. चेअरमन यांचे उपस्थितांनी अभिनंदन केले. सभेस माजी सरपंच महादेव पाटील, माजी चेअरमन मुकुंद पाटील, विक्रम चव्हाण, विजयकुमार धुमाळ, सुरेश पवार, जयवंत पाटील, श्रीमती सुमन पाटील, धनंजय पाटील, आनंदा थोरवडे, गणी सुतार, दिपक भंडलकर, जगन्नाथ पाटील, सनी चव्हाण, तानाजी देशमुख, बाळासाहेब पाटील (आबा), जितेंद्र पाटील, संतोष पाटील, मंगेश पाटील, अतुल पाटील, सनी पाटील इ. मान्यवरांची उपस्थिती होती.

# वाळु चोरांना मदत करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करा : प्रमोद लोखंडे

**म्हसवड :** माणगंगा नदीपात्रातुन वाळु उपशाला बंदी असतानाही येथील नदीपात्रातुन वाळु सम्राटांकडुन महसुल विभागाला हाताशी धरुन अहोरात्र बेकायदेशीरपणे वाळु उपसा सुरु आहे, या वाळु चोरांना महसुलचेच अधिकारी मदत करीत आहेत त्या अधिकाऱ्यांवर व वाळु चोरांवर कारवाई करावी अन्यथा महसुल विभागासमोर आंदोलन करु असा इशारा दलित पँथरचे पश्चिम महाराष्ट्राचे अध्यक्ष प्रमोद लोखंडे यांनी दिला आहे.

याबाबत जिल्हाधिकारी व माण तहसिलदारांना दिलेल्या निवेदनात लोखंडे यांनी म्हटले आहे की माणगंगा नदी पात्रातुन वाळुची मोठ्या प्रमाणावर तस्करी सुरु आहे यामुळे माणगंगा नदीपात्राचे पात्र बदलु लागले आहे.

ठिकठिकाणी नदीपात्रात वाळु चोरांनी मोठ मोठे खड्डे पाडले आहेत त्यामुळे माणगंगेचे रुपडे बदलले आहे, वास्तवीक नदीपात्रातुन वाळु उपसा करण्यात प्रशासनानेच बंदी घातली आहे, असे असताना येथील वाळु चोर महसुली अधिकार्यांना हाताशी धरुन अहोरात्र ही वाळु चोरी करीत आहेत. वाळु चोरांनी माणगंगा नदी पात्रात वाळु उपसा करण्यासाठी काढलेले खड्डे हे जिवघेणे ठरणारे आहेत.

सध्या पावसाळा सुरु आहे माणगंगा नदी पात्रात पाणी आल्यास या खड्डयांमुळे एखाद्याचा जिवही जावु शकतो त्यावेळी त्या जिवाची जबाबदारी कोण घेणार असा संतप्त सवाल लोखंडे यांनी उपस्थित करीत ये त्या ८ दिवसांत संबधित वाळु चोरांवर व त्यांना मदत करणार्या अधिकार्यांवर कारवाई करण्याची मागणी केली असुन सदरची कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा ही लोखंडे यांनी दिला आहे.

# आयोगाच्या दबावामुळे आमच्या १०० जागा गेल्या

## संजय राऊतांचा भाजपावर घणाघात

**नाशिक :** देशभरात १०० जागा केवळ ५०० ते १००० मतांच्या फरकाने आमच्या हातून गेल्या आहेत. मालेगावमध्येही त्याचा प्रत्यय आम्हाला आला. निवडणूक आयोगाचा दबाव त्यात स्पष्ट होत होता. आता तर उद्धव ठाकरे यांनाही आयोगाने नोटीस बजावली आहे. त्यामुळे केंद्रात सत्तापालट झाल्यानंतर पहिली कारवाई निवडणूक आयोगाच्या तीन अधिकाऱ्यांवर केली जाईल असा इशारा उद्धव सेनेचे नेते खा.संजय राऊतयांनी दिला. सांगलीतील जागेबाबत बोलताना त्यांनी काँग्रेस आणि राष्ट्रवादीने साथ न दिल्याचा आरोपही केला.

विधान परिषदेसाठी नाशिक येथून रिंगणात असलेल्या उमेदवाराच्या प्रचारासाठी आले असता ते बोलत होते. ते म्हणाले की, लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला चांगले यश मिळाले. आमच्या किमान १०० जागा अत्यंत कमी मतांनी गेल्या. गेल्या म्हणजे त्या ओरबाडून नेल्या. केंद्रात जेव्हा सत्तापालट होईल त्यावेळी पहिली कारवाई निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांवर करू, असे ते म्हणाले. महाविकास आघाडीत आमचा स्ट्राईक रेट जास्त आहे. आम्ही जास्त जागा लढवायला हव्या होत्या, परंतु महाविकास आघाडीत बिघाड होऊ नये, म्हणून दोन पावले मागे आलो, असे शरद पवार यांनी म्हटले आहे.त्यांना उत्तर देताना राऊत म्हणाले की, शरद पवार यांचा स्ट्राईक जास्त हे खरे आहे. पण, सांगलीच्या जागी काँग्रेसने काम केले नाही. या जागेवर राष्ट्रवादीने काम केले नाही. दुसरीकडे केंद्र सरकारने सगळ्यात जास्त आम्हाला टार्गेट केले. त्याचा फटका शिवसेनेच्या उमेदवारांना बसला, शरद पवार जास्त जागा म्हणजे सगळ्याच तर घेणार नाहीत ना, त्याबाबत बैठकीत ठरवू असा उल्लेख त्यांनी केला. अद्याप बैठक झाली नसून लवकरच ती होईल असेही ते म्हणाले.शिक्षक वर्गाला बाजारात ओढू नका...

मुख्यमंत्री पुन्हा नाशिकला येऊन गेले. ते कशासाठी येतात हे माहिती आहे. शेअर बाजाराप्रमाणे भाव लावला जातो. शिक्षकांना विकत घेऊ नका. परंपरा मोडू नका, पैसे वाटपाचा व्हिडीओ सुषमा अंधारे यांनी ट्विट केला. त्यावर बोलताना राऊत म्हणाले, हेलिकॉप्टरमध्ये २० कोटी उतरवले हे सगळ्यांनी पाहिले. पदवीधर शिक्षक या वर्गाला बाजारात ओढू नका. लोकशाहीची हत्या होत आहे. निवडणूक आयोग धृतराष्ट्राप्रमाणे हे सर्व पाहत असल्याचा आरोपही त्यांनी केला.

# संत सोपानदेव महाराज पालखी ओढण्याचा मान महाडिकांच्या 'देवा' बैलाला, सर्व स्तरातून कौतुक

**सातारा :** संत ज्ञानेश्वर महाराज यांचे धाकटे बंधू संत सोपानदेव महाराज पालखी सोहळ्याचे सासवडमधून ३ जुलै रोजी सकाळी ११ वाजता सोपानदेव मंदिरातून प्रस्थान होणार आहे. या सोहळ्याच्या रथासाठी सातारा जिल्ह्यातील दुर्गम भागामधील जावली तालुक्यातील घोटेघर गावचे सुपुत्र आणि सुप्रसिध्द कीर्तनकार ह.भ.प.अविनाश महाराज महाडिक (जावलीकर) यांच्या 'देवा' बैलाला पालखी रथ ओढण्याचा मान मिळाला आहे. त्यामुळे महाडीक व त्यांच्या देवाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. संतश्रेष्ठ श्री सोपानदेव महाराज पालखी सोहळा श्री. क्षेत्र सासवड ते श्री. क्षेत्र पंढरपूर पालखी रथासाठी महाराष्ट्रातील सुप्रसिध्द कीर्तनकार ह.भ.प.अविनाश महाराज महाडिक (जावलीकर) यांचा लाडका 'देवा' बैलाला पालखी रथ ओढण्याचा मान मिळाला. मेढा येथील बैल बाजारात २०२२ मधील सगळ्यात मोठी विक्रमी बोली करून 'देवा' या बैलाची महाडिक यांनी खरेदी केली होता. तोच बैल आज पालखीचा मानकरी ठरला आहे. ह.भ.प. अविनाश महाराज हे बालपणापासूनच आध्यात्मिक क्षेत्रात आहेत. त्यांनी आळंदी येथे आध्यात्मिक शिक्षण घेतले आहे. गेल्या १५ वर्षापासून ते सातारा, महाबळेश्वर, जावळी, वाई आणि राज्यातील इतर जिल्ह्यातही कीर्तन सेवा करत आहेत. अविनाश महाराज हे ऐतिहासिक कीर्तनही करतात. महाडिक यांच्या 'देवा' या बैलाला हा मान मिळाल्यामुळे कुटुंबासह गावाची शान वाढली आहे.

दरवर्षी पालखी सोहळ्यात सहभागी होऊन पंढरपूरच्या पांडूरंगाच्या वारीला जाणाऱ्या वारकऱ्याच्या घरच्या बैलाला पालखी रथ ओढण्यासाठी मान मिळाला यापेक्षा भगवंताची मोठी कृपा असूच शकत नाही, अशी भावना ह.भ.प.अविनाश महाराज महाडीक यांनी व्यक्त केली आहे.

# हे सरकार जुमलेबाजांच; मराठा-ओबीसींची करताहेत फसवणूक

**पुणे :** राज्यात मराठा विरुद्ध ओबीसी वाद पेटला असून सगेसोयरे बाबतचा आणि कुणबी नोंदी रद्द कराव्या या मागणीसाठी ओबीसी समाजाच्यावतीने उपोषण केले जात होते. आज सरकारचे शिष्टमंडळ या उपोषणकर्त्यांना, कार्यकर्त्यांना भेटले.

राज्यात ओबीसी आणि मराठा समाजात सुरू असलेल्या वादाबाबत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या खा. सुप्रिया सुळे यांना याबाबत विचारले असता त्या म्हणाल्या की, राज्यात मराठा आणि ओबीसी असा जो वाद सुरू आहे त्याला सरकार जबाबदार आहे. हे सरकार जुमलेबाजांचे सरकार असून मराठा आणि ओबीसी समाजाला फसवत आहे, अशी टीका यावेळी सुळे यांनी केली.

पुण्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यालयात खा. सुप्रिया सुळे यांची पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. यावेळी त्या बोलत होत्या. आज सरकारच्या शिष्टमंडळाने आंदोलन ठिकाणी भेट दिली. याबाबत सुळे यांना विचारले असता त्या म्हणाल्या की, उशिरा का होईना; पण सरकारला जाग आली आहे.

मराठा, धनगर, मुस्लिम, लिंगायत आणि भटक्या विमुक्त यांच्या आरक्षणाच्या बाबत दहा वर्षाच्या पूर्वी पहिल्या कॅबिनेटमध्ये आम्ही निर्णय घेऊ हे बारामतीत येऊन सांगितले होते. गेल्या दहा वर्षापासून गल्ली ते दिल्ली त्यांची सत्ता असून आता कमी का होईना, पण पुन्हा एकदा सत्तेत आलो आहोत. आरक्षणाबाबत सरकारने प्रस्ताव मांडावा. आम्ही पूर्ण ताकदीने त्याला पाठिंबा देऊ असे यावेळी सुळे म्हणाल्या.

खा. सुप्रिया सुळे यांना आजच्या बैठकीबाबत विचारले असता, त्या म्हणाल्या की, माझ्याकडे अजूनही अजेंडा आलेला नाही. मला मीटिंगला बोलावले आहे. संघटनेच्या अनेक बैठका घेत आहे आणि आज याचीच बैठक होत आहे. आज यशस्विनी महिला सन्मान कार्यक्रम होता. पवार साहेब यांनी पहिल्यांदा महिला धोरण आणलं आणि याच दिवशी आम्ही आढावा घेतला आहे.

# लातुरात मटका बुकींची दादागिरी; पीएसआयला केली मारहाण

**लातूर :** पोलीस उपनिरीक्षकास मटका बुकींनी मारहाण केल्याची खळबळजनक घटना घडली आहे. वीस ते पंचवीस जणांचा जमाव पोलीस उपनिरीक्षकावर धावून गेला. पोलीस ठाण्याला माहिती कळूनही मदतीला आले नाहीत असा पोलीस उपनिरीक्षकानी आरोप केला आहे. या आरोपानंतर लातूर पोलीस दलात उलट सुलट चर्चेला उधाण आले आहे.

मटका बुकिंचे धाडस दिवसेंदिवस वाढताना दिसत आहे. पोलीस उपनिरीक्षकने अवैध धंदे करू नका असा दम दिल्याकारणाने चिडलेल्या मटका बुकीने आपल्या वीस पंचवीस साथीदारासह पोलीस उपनिरीक्षकावर हल्ला केला आहे. हा सर्व प्रकार महामार्गाच्या बाजूलाच सुरू होता. रस्त्यातील प्रवाशांनी मध्यस्थी करून विषय मिटवला खरा मात्र आता विविध चर्चा सुरू आहेत. समोर आलेल्या माहितीनुसार, लातूर जिल्ह्यातील रेणापूर पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक हनुमंत घुले हे पेट्रोलिंगसाठी काल दुपारी बाहेर पडले होते. शेरा गावाजवळ त्यांना काही लोक जुगार खेळताना दिसून आले. पुन्हा या भागात जुगार खेळताना दिसल तर खडक कारवाई करू असा दम तेथील लोकांना दिला. संध्याकाळी ते रेनापूर पोलीस ठाण्याकडे निघाले असता त्या भागातील मटकाबुकी आणि २० ते २५ जण त्यांच्यावर चालून गेले. हातात धारदार शस्त्र आणि काठी असलेल्या जमावाने पोलीस उपनिरीक्षक हनुमंत घुले यांना धक्काबुक्की केली कपडे फाडण्याचा प्रयत्न केला. हा सर्व प्रकार लातूर औरंगाबाद महामार्गावरच सुरू होता. रस्ता बंद असल्याकारणाने या भागातील प्रवास करणाऱ्या प्रवाशांनी मध्यस्थी करत भांडण मिटवले.

मला मारहाण सुरू होती याची माहिती मी रेणापूर पोलीस ठाण्याला दिली. पोलीस निरीक्षक ठाण्यात होते मात्र त्यांनी कोणालाही पाठवलं नाही, अशी माहिती पोलीस उपनिरीक्षक हनुमंत घुले यांनी दिली आहे. याबाबतपोलीस उपनिरीक्षक हनुमंत घुले यांनी रेनापुर पोलीस ठाण्यात लेखी तक्रार देत असल्याची माहिती काल संध्याकाळी दिली होती. त्यांच्यावर खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मात्र अद्यापही त्याप्रकरणी पुढे काय झालं याची माहिती पोलीस ठाण्यातून उपलब्ध होत नाही. अद्यापही याप्रकरणी गुन्हा दाखल झाला नाही. पोलिसांचे आणि मटका बुकींचे कायमच हितसंबंध असतात असा आरोप होत आलेला आहे. यामुळेच काल संध्याकाळी घडलेल्या घटनेचा अद्याप गुन्हा दाखल झाला नाही अशी चर्चा आता जोर धरू लागली आहे. या घटनेचे काही व्हिडिओ आता सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत, घटनेची माहिती कळाली आहे. काही वेळात कायदेशीर प्रक्रिया पूर्ण होईल. या घटनेतील दोषी असलेल्यांवर योग्य ती कारवाई होईलच, अशी माहिती लातूरचे पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी दिली आहे.

# केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्या हस्ते डॉ. मनोहर डोळे यांचा सत्कार

**नारायणगाव :** संस्थेचे संस्थापक व प्रमुख विश्वस्त डॉ. मनोहर डोळे यांना पद्मश्री मिळाल्याबद्दल केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी नारायणगाव येथील डॉक्टर मनोहर डोळे यांच्या हॉस्पिटलला सदिच्छा भेट दिली व डॉ. मनोहर डोळे यांचा केंद्रशासनाच्या वतीने शाल व श्रीफळ देऊन सत्कार केला.

यावेळी त्यांनी प्रत्येक विभागाची सखोल माहिती घेऊन चालू असलेल्या कार्याचा आढावा घेतला. तसेच मोफत नेत्र तपासणी शिबिरातून आलेल्या प्रत्येक रूग्णांची विचारपूस करून संवाद साधला. या मोहिमेमध्ये डॉ. डोळे मेडिकल फाऊंडेशनला सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.

डॉ. डोळे फाऊंडेशनच्या वतीने ग्रामीण व अदिवासी भागात चालू असलेल्या या सामाजीक कार्याचे त्यांनी कौतूक केले. याच मोहीमेतून आजपर्यंत दोन लाख मोतीबिंदू शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आल्या आहेत.

याप्रसंगी कृषीरत्न अनिलतात्या मेहेर, पोपटशेठ घनवट, संस्थेचे विश्वस्त डॉ. संदीप डोळे, डॉ. स्मिता डोळे तसेच इतर पदाधिकारी, मान्यवर उपस्थित होते.

आठवले यांनी डोळे फाउंडेशनचे संस्थापक व प्रमुख विश्वस्त डॉ. मनोहर डोळे, वय ९६ वर्षे यांची भेट घेऊन त्यांच्या तब्बेतीची विचारपूस केली व याही वयात तितक्याच उमेदीने सामाजिक काम करत असल्याचे कौतूक केले. या भेटी दरम्यान संस्थेच्या चालू असलेल्या अद्ययावत मोबाईल आय क्लिनिक (डोळयाचा फिरता दवाखाना) याची पाहणी केली व अशाच मोबाईल आय क्लिनिक गावोगावी सुरू केल्या तर गरीब व गरजू रुग्णांना त्यांच्या दारापर्यंत सुविधा देता येईल असं मत त्यांनी व्यक्त केले.

डोळे फाऊंडेशनने आदिवासी व दलित समाजातील लोकांसाठी अनेक नेत्र शिबिरे आयोजित केली असून त्यातून अनेक रुग्णांना त्यांनी दृष्टी प्राप्त करून दिली आहे व समाजासाठी दृष्टीचे खूप मोठे योगदान दिलेल्या योग्य व्यक्तीला पदमश्री मिळाला आहे याचा आम्हांला अभिमान आहे, तसेच डॉ. डोळे यांच्या एवढ्या वर्षाच्या सेवाकार्याला माझा सलाम आहे असे मनोगत त्यांनी व्यक्त केले. तसेच या संस्थेला मदत करण्याचेही आश्वासन दिले. उपस्थित मान्यवरांचे आभार विश्वस्त डॉ. संदीप डोळे यांनी मानले.

# तीन महिन्यात राज्यात पुन्हा आपले सरकार येईल

मुंबई, दि.२३ (वृत्तसंस्था) : राज्यात महाविकास आघाडी सरकार असताना मोठी गुंतवणूक राज्यात येत होती. मात्र, या गद्दारांनी सरकार पाडले. तीन महिन्यात राज्यात पुन्हा आपले सरकार येईल, असा विश्वास शिवसेना ठाकरे गटाचे नेते अनिल परब यांनी व्यक्त केला.

पदवीधर मतदारसंघातून अनिल परब निवडणुकीच्या रिंगणात आहेत. अनिल परब यांनी सत्ताधाऱ्यांवर जोरदार टीका केली. परब म्हणाले की, यापूर्वी मी विधान परिषदेवर आमदारांमधून निवडून जात होतो. आता मी पदवीधर मतदारसंघातून निवडून जाणार आहे. मी पदवीधरांसाठी काय करणार आहे, माझे विचार काय आहे ते वचननाम्यामध्ये असल्याचे परब यांनी सांगितले. पदवीधर निवडणूक आतापर्यंत पाचवेळा शिवसेनेने जिंकली असल्याचे ते म्हणाले.

ते म्हणाले की, आपल्या राज्यात मोठी गुंतवणूक येत असताना गद्दारांनी सरकार पाडले. आता तीन महिन्यात आपले सरकार येईल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. ते पुढे म्हणाले की पदवीधरांना नोकरी मिळत नाहीत. परदेशात जाणाऱ्या पदवीधर तरुणांना, तसेच विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन सुद्धा मिळत नाही. त्यामुळे पदवीधर बेरोजगार तरुणांना कोणत्याही योजना माहीत नाहीत. त्यामुळे तरुणांसाठी वेगळे व्यासपीठ तयार करणे माझे कर्तव्य माझे काम असल्याचे ते म्हणाले.मला माझ्या पक्षाचा पूर्ण पाठिंबा असल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान, आदित्य ठाकरे यांनी आज राज्यपालांची भेट घेतली. या भेटीवरपरब यांनी भाष्य केले. ते म्हणाले की परीक्षांचा घोळ होत असल्याने यासाठी वेगळा कक्षा असायला हवा. त्यासाठी वेगळी यंत्रणा असला पाहिजे. ज्यांची पात्रता आहे तो बाहेर असतो आणि पात्रता नसतो तो मेरिटमध्ये असतो अशी टीकाही त्यांनी केली. नवीन आर्थिक मागासवर्गीय मुले आहेत त्यांच्यासाठी कोणतीही संस्था नसल्याचे त्यांनी सांगितले.

दरम्यान, कोणत्याही कारणाशिवाय निवडणूक आयोगाने मुंबई पदवीधर मतदारसंघाच्या पुरवणी यादीत १२ हजार नावे समाविष्ट केली नसल्याचा आरोप अनिल परब यांनी केला होता. या आरोपाची आयोगाने दखल घेतली आहे. परब यांनी दिलेली नावे मतदार यादीत का समाविष्ट झालेली नाहीत याचा शोध सुरू करण्यात आला आहे. आक्षेपानंतर मतदान केंद्र बदलण्याच्या हालचालीही आयोगाने सुरू केल्या आहेत. परब यांनी अर्ज नाकारण्याची कारणे समजणे हा अधिकार आहे. यंदा अर्ज स्वीकारूनही नावे आली नाहीत आणि त्याची कोणतीही कारणे आम्हाला दिलेली नाहीत. यात खूप मोठी गडबड असल्याचा अनेक गंभीर आरोप परब यांनी केले होते.

# पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर योजनेअंतर्गत ग्रामीण भागातील विद्यार्थीनींना मोफत एस.टी पासचे वाटप



**नारायणगाव :** गुरुवर्य रा.प.सबनीस विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालय नारायणगाव याठिकाणी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर योजनेअंतर्गत ग्रामीण भागातील विद्यार्थीनींना मोफत एस.टी पासचे नुकतेच वाटप करण्यात आले.

यावेळी मुलींनी प्रवासात येणाऱ्या समस्या मांडल्या त्यावर तात्काळ सकारात्मक निर्णय घेऊन प्रश्न सोडविण्याचे आश्वासन एस टी चे पुणे विभागीय वाहतूक अधिकारी कैलास पाटील व नारायणगावचे आगार व्यवस्थापक वसंत अरगडे यांनी दिले. शिंगवे मार्गे येणारी बस वळती गावातून येण्याची व्यवस्था केली जाईल त्याचबरोबर निमगावसावा,खोडद,उंब्रज सावरगाव मार्गे येणाऱ्या तसेच बेल्ह्यावरून बोरी मार्गे येणाऱ्या बसेसच्या वेळा नियंत्रित करण्याची व्यवस्था केली जाईल असे पाटील म्हणाले. यावेळी विद्यार्थीनींमध्ये समाधानाची व उत्साहाची प्रतिक्रिया पाहायला मिळाली. उपप्राचार्य हनुमंत काळे म्हणाले की,विद्यार्थिनींनी शासनाच्या या योजनेचा फायदा घ्यावा तसेच प्रवासात एसटीची स्वच्छता ठेवण्याकडेही विद्यार्थीनींनी सामाजिक भावनेतून समाजापुढे आदर्श निर्माण होईल असे वर्तन ठेवावे. त्याचबरोबर एसटी स्टँड परिसरातील स्वच्छतेच्या बाबतीत एन.एस.एस च्या विद्यार्थ्यांतर्फे परिसर स्वच्छता केली जाईल अशी ग्वाही उपप्राचार्य हनुमंत काळे यांनी दिली.

यावेळी कैलास पाटील, विभागीय वाहतूक अधिकारी, वसंत अरगडे आगार व्यवस्थापक नारायणगाव,वाहतूक नियंत्रक विष्णू राठोड, शिवाजीराव वायकर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य हनुमंत काळे यांनी तर सूत्रसंचालन संतोष देशपांडे यांनी तर आभार पर्यवेक्षक संजय वलटे यांनी मानले यावेळी सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये आरक्षणासंदर्भात चर्चा होणार

**नाशिक :** राज्यात आरक्षणावरून सुरू असलेल्या आंदोलनासंदर्भात जरांगे पाटील आणि हाके यांच्याशी शासनातर्फे चर्चा झाली असून मंत्रिमंडळाच्या येत्या बैठकीत त्यावर नक्कीच सकारात्मक चर्चा होईल असे संकेत मुख्यमंत्रीएकनाथ शिंदेयांनी नाशिक दौऱ्यात दिले.

विधान परिषद निवडणूक प्रचारासाठी आले असता ते पत्रकारांशी बोलत होते.-ऊत्एठ्ठखडएचएछ्ढ्ढ्शीशव लूलोकसभा निवडणुकीत उमेदवार जाहीर करण्यात झालेला विलंब आम्हाला भोवल्याची कबुली त्यांनी प्रथमच दिली तसेच विरोधकांनी पसरवलेले गैरसमज खोडून काढण्यात आम्ही अपयशी ठरल्याने काही ठिकाणी फटका बसल्याचेही ते म्हणाले. मात्र असा गैरसमज पसरवणारा खोटा प्रचार करूनही विरोधकांना सत्ता मिळालीच नाही. त्यामुळे जनता कामालाच प्राधान्य देते खोट्या प्रचाराला नाही हे सिद्ध झाले.

# पोलीस निरीक्षकपदी बढतीबद्दल ग्रामपंचायतीच्यावतीने सन्मान

## गावातील पहिला पोलीस निरीक्षक होण्याचा मान



**तासगाव :** तालुक्यातील वायफळे येथील प्रमोद लक्ष्मण नलवडे यांची नुकतीच पोलीस निरीक्षकपदी बढती झाली. ते आता पुणे येथे सीआयडीला आपली सेवा बजावणार आहेत. वायफळे येथील पहिला पोलीस निरीक्षक होण्याचा मान नलवडे यांनी मिळवला आहे. त्यांना मिळालेल्या बढतीबद्दल वायफळे ग्रामपंचायतीच्यावतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

वायफळे येथील प्रमोद नलवडे यांची २०१० मध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेतून पोलीस उपनिरीक्षक पदी निवड झाली होती. गेली १४ वर्षे ते महाराष्ट्र पोलीस दलात अतिशय उत्कृष्टपणे सेवा बजावत आहेत. वायफळे येथील खंडेराया व्यायाम संस्थेचे ते खेळाडू आहेत. कबड्डी व क्रिकेट या खेळामध्ये त्यांनी प्राविण्य मिळविले होते.

पोलीस दलात भरती झाल्यानंतर त्यांनी नाशिक व मुंबई येथे पोलीस उपनिरीक्षक म्हणून काम केले. त्यानंतर २०१४ मध्ये त्यांची सहाय्यक पोलीस निरीक्षक म्हणून पदोन्नती झाली. त्यानंतर त्यांनी पुणे व सोलापूर या ठिकाणी सहाय्यक पोलीस निरीक्षक म्हणून काम केले.

दरम्यान सुमारे १४ वर्षे पोलीस दलात कर्तव्य बजावल्यानंतर त्यांची आता पोलीस निरीक्षक म्हणून पदोन्नती झाली आहे. सोलापूर येथून त्यांची पुणे सीआयडी येथे पदोन्नतीवर बदली झाली आहे. त्यांच्या पदोन्नतीमुळे वायफळेकरांच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. नलवडे यांच्या पदोन्नतीबद्दल वायफळे ग्रामपंचायतीच्यावतीने त्यांचा आज सत्कार करण्यात आला. यावेळी माजी बांधकाम व आरोग्य सभापती साहेबराव पाटील वायफळेचे लोकनियुक्त सरपंच संतोष नलवडे, दिनकर पाटील, दशरथ नलवडे, जगन्नाथ घोडके, भगवान नलवडे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.



# ढवळीत जलजीवनच्या कामाची चौकशी सुरु

## पाणीपुरवठा विभागाची ठेकेदाराला नोटीस

**तासगाव :** तालुक्यातील ढवळी ग्रामपंचायतीकडून जलजीवन मिशन अंतर्गत पाण्याची टाकी व पाईपलाईन चे हे काम अतिशय निकृष्ट व चुकीच्या पद्धतीने चालू असून ढवळीत जलजीवनच्या कामात भ्रष्टाचार झाला आहे. याप्रकरणी ठेकेदाराला काळ्या यादीत टाकून कारवाई करा अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा मनसे नेते अमोल काळे यांनी बीडीओ संताजी पाटील यांना निवेदनाद्वारे दिला होता.

मनसेच्या या इशाऱ्यानंतर तासगाव पंचायत समितीचा पाणीपुरवठा विभाग खडबडून जागा झाला. सरपंच प्रकाश पाटील,मनसे नेते अमोल काळे यांच्यासह चर्चा करून त्यांनी ठेकेदार अन्वी कन्स्ट्रक्शनला तात्काळ नोटीस काढली आहे.

शुक्रवारी पंचायत समितीत झालेल्या बैठकीत सरपंच ढवळी , अमोल काळे व ग्रामीण पाणी पुरवठा विभाग यांच्यात चर्चा झाली. यात गावठाण हद्दीतील फुटलेले काँक्रिटीकरण करणे, खुडे वस्तीचा रस्ता पूर्ववत करणे, झालेल्या पाईप लाईन वर खड्डे काढून सरपंच व संबधित तक्रारदार यांचे समक्ष पाईपची खोली दाखविणेत यावी, आवश्यक त्या ठिकाणी जीआय पाईप वापरावी. अशी नोटीस ठेकेदाराला काढण्यात आली अशी माहिती अमोल काळे यांनी दिली.

# हायवेच्या नियोजनशून्य कामावर पृथ्वीराज बाबा भडकले

## हायवेवरील ट्राफिक समस्या गांभीर्याने घेण्याबाबत अधिकाऱ्यांना दिल्या सूचना



**कराड :** दोन दिवसापूर्वी कराड परिसरात मुसळधार पाऊस झाल्याने हायवेवरील कामामुळे आटके टप्पा व पाचवड फाटा येथे पाणी साचल्याने वाहनांची मोठी रांग लागून दुरवर ट्राफिक झाले होते. याबाबत कराडचे पत्रकार अस्लम मुल्ला यांनी ट्राफिक समस्येची बातमी केली होती तसेच दक्ष कराडकर या सामाजिक संस्थेचे प्रमुख प्रमोद पाटील यांनी माजी मुख्यमंत्री आ. पृथ्वीराज चव्हाण यांना निवेदन देऊन हायवेवरील कामामुळे निर्माण झालेली ट्राफिक समस्येबाबत माहिती दिली. त्यांच्या निवेदनाची तात्काळ दखल घेऊन ट्राफिक परिस्थितीची स्वतः जाऊन पाहणी करून वाहतुकीला अडथळा होऊ नये यासाठी कराड शासकीय विश्रामगृह येथे हायवेच्या अधिकाऱ्यांची मिटिंग घेऊन तिथूनच NH-I (एन एच ए आय) चे प्रोजेक्ट प्रमुख पंधरकर यांना दूरध्वनीद्वारे कराड येथील हायवेच्या कामाची परिस्थिती सांगून झालेल्या पावसाने महामार्गांवर पाणी साठल्याने कशा प्रकारे ट्राफिक समस्या उद्धवते याची माहिती देऊन हायवेच्या नियोजनशून्य कामावर संताप व्यक्त केला. हायवेच्या नियोजनशून्य कामामुळे सामान्य नागरिकांना पहिल्या पावसातच समस्येला सामोरे जावे लागले यामध्ये सुधारणा करून तात्काळ आटके टप्पा व पाचवड फाटा येथील सर्व्हिस रस्त्यावर साठलेले पाणी जाण्यासाठी ड्रेनेज मार्ग करावा आणि इथून पुढील काम नियोजन पद्धतीने करावे अशा सक्त सूचना माजी मुख्यमंत्री आ. पृथ्वीराज चव्हाण यांनी दिल्या.

आ. चव्हाण यांच्या सूचनेनंतर हायवेच्या अधिकाऱ्यांनी तात्काळ जिथे पाणी साठले आहे त्या ठिकाणी जेसीबी च्या साहाय्याने पाणी जाण्यासारखा मार्ग केला व त्यानंतर काही वेळातच ट्राफिक पूर्ववत झाले.

हायवेचे काम सुरु झालेपासून माजी मुख्यमंत्री आ. पृथ्वीराज चव्हाण यांनी सुरुवातीला प्रत्येक १५ दिवसांनी तर त्यानंतर वेळोवेळी हायवेच्या कामाबाबत अधिकाऱ्यांसोबत मिटिंग घेऊन कामाचे नियोजन बघितले आहे. कराड व मलकापूर येथील उड्डाणं पुलाच्या कामावेळी तर आ. चव्हाण यांनी वेळोवेळी प्रत्यक्ष पाहणी करून कामही वेळेत व्हावे आणि ट्राफिक समस्या सुद्धा होऊ नये याबाबत अधिकाऱ्यांना सूचना दिल्या होत्या. आता उड्डाणं पुलाचे काम निम्याहून अधिक पूर्ण झाले असून आता कोल्हापूर कडे जाणाऱ्या हायवे विस्ताराचे काम सुरु आहे याठिकाणी निर्माण झालेल्या समस्येबाबत पुन्हा एकदा मिटिंग घेऊन सूचना आ. चव्हाण यांनी दिल्या आहेत.

# खोलीचा अंदाज न आल्याने तरुण बुडाला, शोधकार्य सुरु

**पवनानगर :** पवना धरणात बुडून १८ वर्षीय तरुण बुडाल्याची घटना रविवारी (दि.२२) रोजी सायं ५ वाजण्याच्या सुमारास फांगणे (ता. मावळ) येथे ही घटना घडली. अद्वेत सुदेश शर्मा (वय १८, सध्या रा. विमाननगर पुणे, मुळ. दिल्ली)असे धरणात बुडालेल्या तरुणाचे नाव असून तो सिम्बायोसिस कॉलेज येथे शिकत होता.

लोणावळा ग्रामीण पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पुणे येथील पाच मित्र मैत्रिणी पवना धरण परिसरात फिरण्यासाठी आले होते. तो पाण्यात पोहण्यासाठी उतरला होता. पाण्याच्या खोलीचा अंदाज न आल्याने तरुण बुडाला असल्याचे लोणावळा ग्रामीण पोलीसांकडून सांगण्यात आले आहे. या घटनेची माहिती मिळताच लोणावळा ग्रामीणचे पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत घटनेची पाहणी केली. शिवदुर्ग रेस्क्यू टिम लोणावळा व स्थानिक ग्रामस्थांच्या मदतीने तरुणाला शोधण्याचा प्रयत्न करत आहे. घटनेची माहिती मयताच्या नातेवाईकांना देण्यात आली असून, या घटनेचा पुढील तपास लोणावळा ग्रामीण पोलीस करत आहेत.

# दहिवडी पोलिसांनी आठ लाखाचे मोबाईल केले हस्तगत



**दहिवडी :** दहिवडी पोलिसांनी गहाळ झालेल्या मोबाईलची राज्यातील विविध भागात जावून संबंधितांकडून २४ मोबाईल हस्तगत केले.यातील अनेकांचे मोबाईल गहाळ झाले होते.तर काहींचे मोबाईल चोरीला गेले होते. दहिवडी पोलिसांच्या दबंग कामगिरीमुळे मोबाईल मधील ई एम आय नंबर जुळवून मोबाईल माघारी मिळवले. मोबाईल चोरांना व ते विकत घेणाऱ्याला ही मोठी चपराक बसली आहे. यापुढे आता लोक पावती शिवाय मोबाईल खरेदी करण्याचे धाडस करणार नाहीत.

याबाबतचे सविस्तर वृत्त असे पोलीस अधिक्षक समीर शेख, अप्पर पोलीस अधिक्षक श्रीमती आंचल दलाल, दहिवडी च्या उपविभागिय पोलीस अधिकारी, श्रीमती अश्विनी शेंडगे या सर्वांच्या मार्गदर्शनाखाली दहिवडी पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक अक्षय सोनवणे यांनी नागरिकांचे हरविलेले मोबाईल शोध घेण्यासाठी पोलीस अमंलदार यांचे पथक तयार करुन त्यांना सुचना दिलेल्या होत्या. त्याअनुशंगाने पथकातील पोलीस स्टाफने सी.ई.आय.आर. पोर्टल व इतर तांत्रिक बाबीचे आधारे हरविलेले मोबाईलबाबतची माहिती प्राप्त करुन चिकाटीने मोहीम राबविल्याने दहिवडी पोलीस ठाणे हद्दीतून नागरिकांचे गहाळ व चोरी झालेले एकूण ७ लाख ५० हजार रुपये किंमतीचे एकूण २४ मोबाईल हस्तगत करण्यात यश आलेले आहे. आज उपविभागिय पोलीस अधिकारी, अश्विनी शेंडगे यांचे हस्ते मुळ तक्रारदारांना त्यांचे मोबाईलचे वाटप करण्यात आले.

दहिवडी पोलीस ठाणेचे प्रभारी अधिकारी सहायक पोलीस निरीक्षक श्री. अक्षय सोनवणे, पो. हवा. बापु खांडेकर, पो.ना. नितीन धुमाळ, पो.कॉ. निलेश कुदळे, पो.कॉ. असिफ नदाफ, पो.कॉ. महेंद्र खाडे. सायबर पोलीस ठाणेचे पो. कॉ. महेश पवार, यांनी या मोहिमेत सहभाग घेतला.

दहिवडी पोलिसांनी राज्यातील विविध भागात फिरून मोठ्या प्रयत्नाने मोबाईल हस्तगत केले.

ज्यांचे मोबाईल गहाळ किंवा हरवले असल्यास नागरिकांनी दहिवडी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करावी अशाच प्रकारे सातत्याने मोबाईलची शोध मोहीम राबवण्यात येणार असल्याचे दहिवडी पोलीस ठाणेचे सहायक पोलीस निरीक्षक अक्षय सोनवणे यांनी सांगितले.

# 'शिवाजी सागर' जलाशयात पाण्याची आवक सुरू

## कोयना धरणात १६.२४ टीएमसी पाणीसाठा



**पाटण, :** कोयना धरण पाणलोट क्षेत्रात झालेल्या संततधार पावसामुळे कोयना धरणात पाण्याची आवक सुरू झाली. प्रथम २४ तासात धरणात ५ हजार ५१७ क्युसेस्क पाण्याची आवक झाली असून सध्या पाऊस कमी झाल्याने ३ हजार ७९२ कयुसेक्स पाण्याची आवक होत असल्याची माहिती कोयना धरण व्यवस्थापनाने दिली.

शुक्रवारी पहाटेपासूनच कोयना धरण पाणलोट क्षेत्रात पावसाने संततधार बरसायला सुरूवात केली. १०५.२५ टीएमसी पाणी साठवण क्षमता असणाऱ्या कोयना धरणाच्या शिवाजी सागर जलाशय परिसरात झालेल्या पावसाने धरणाच्या पाणीसाठ्यात वाढ होऊ लागली आहे.

गेल्या २४ तासात कोयनानगर येथे १५ मिलिमीटर, नवजा येथे ४२ आणि महाबळेश्वर येथे १५ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे. धरणातील पाणीपातळी २०४५.१० फूट इतकी झाली असून धरणात प्रतिसेकंद ३ हजार ५१७ क्युसेक पाण्याची आवक होत आहे. परिणामी गेल्या २४ तासांत कोयना धरणाच्या पाणीसाठ्यात ०.३३ टीएमसी इतक्या पाण्याची वाढ होऊन रविवारी सकाळी ८ वाजेपर्यंत धरणातील पाणीसाठा १६.२४ टीएमसी इतका झाला आहे. सकाळी ८ वाजेपर्यंत कोयनानगर येथे १५ (५२२) मिलिमीटर, नवजा येथे ४२ (६६८) मिलिमीटर आणि महाबळेश्वर येथे १५ (४३६) मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे.

# सातार्‍यात प्रा.शिक्षक बँकेची वार्षिक सभा अभुतपूर्व गोंधळाविना

**सातारा :** सातारा येथील प्राथमिक शिक्षक सहकारी बँकेची निवडणूक व गोंधळ हे समीकरण झाले होते. पण, बँकेच्या शताब्दी महोत्सव वर्षा निमित्त ७७ व्या वार्षिक सभेमध्ये सर्वच प्राथमिक शिक्षक सभासदांनी आचरण चांगले ठेवले . ही वार्षिक सभा अभुतपूर्व गोंधळाविना पार पडली. त्यामुळे प्राथमिक शिक्षक बँकेच्या सर्व सभासदांना सातारकरांनी धन्यवाद देऊन त्यांना शताब्दी महोत्सवी वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या.

प्राथमिक शिक्षक सहकारी बँकेच्या ७७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभा मोरया लॉन्स मंगल कार्यालय, दत्तनगर, सातारा- रहिमतपूर रोड कोडोली या ठिकाणी दुपारी एक वाजता सरस्वती पूजन व दीप प्रज्वलाने सुरू झाली. प्रारंभी स्वागत व श्रद्धांजली आणि प्रस्ताविक भाषण व विषय पत्रिकेच्या कामकाज , वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृत्तांत वाचून तसेच अहवाल सादर केल्यानंतर शांततेने वाटचाल करत सभा सुरू झाली. ऐनवेळीच्या विषयाने सभेला सर्व विषय एकमतने मंजूर करण्यात आले.

प्राथमिक शिक्षक संघ व प्राथमिक शिक्षक समिती आणि इतर संघटना या सर्वांच्या सहकार्याने सभेपूर्वीच सर्वांनी एकमेकांशी समझोता करून शताब्दी महोत्सवी वर्षात प्राथमिक शिक्षक बँकेच्या वार्षिक सभा शांततेत पार पाडण्याचे सूचिन्ह दाखवले. बंदोबस्तासाठी असलेल्या पोलिसांनाही त्यामुळे चांगलाच आराम मिळाला. चेअरमन किरण यादव, व्हाईस चेअरमन शहाजी खाडे, मुख्य कार्यकारी अधिकारी छगन खाडे ,बँकेचे संचालक नवनाथ जाधव ,संजीवनी जगदाळे, विजय ढमाळ, सौ पुष्पलता बोबडे, राजेंद्र बोराटे, विजय बनसोडे ,शशिकांत सोनवलकर, नितीन काळे, तानाजी कुंभार, सुरेश पवार, सौ निशा मुळीक, नितीन फरांदे, विशाल कणसे, ज्ञानबा डाबरे, संजय संकपाळ यांनी विविध विषयाला सूचक व अनुमोदक म्हणून आपली भूमिका जाहीर केली.

या सभेला सर्व प्राथमिक शिक्षक सभासदांनी शांततामय वातावरण कायम राखण्यासाठी समंजस भूमिका घेतली. हे आकर्षणाचे केंद्र ठरले. संचालक व शिक्षक सभासद यांनी या वार्षिक सभेला आपली भूमिका विशद करताना प्राथमिक शिक्षक बँकेने घेतलेल्या निर्णयाचा आढावा घेतला. अ वर्ग असलेल्या प्राथमिक शिक्षक सहकारी बँक लिमिटेड सातारा या बँकेचे ''''''''''''आपली बँक आपली माणसं'''''''''''''' हे घोषवाक्य या ठिकाणी तंतोतंत पाळण्यात आले. याचा सार्थ अभिमान प्राथमिक शिक्षकांच्या सर्व संघटनेला वाटला आहे. खरं म्हणजे शिक्षक बँकेची प्रगती ही सत्ताधाऱ्यांसोबत विरोधकांनी दाखवलेल्या समंजसपणामुळे अधिक उंचावणारी आहे.

शिक्षक नेते संभाजीराव थोरात, सिद्धेश्वर पुस्तके, राजेंद्र बोराटे, बळवंत पाटील, विश्वंभर रणनवरे, चंद्रकांत यादव, दीपक भुजबळ, विठ्ठल माने, महेंद्र जानुगडे, सुरेश गायकवाड, नारायण शिंगटे, सतिश जाधव व सर्व संचालक व पदाधिकारी कर्मचारी, अधिकारी व सभासद यांचेही सहकार्य लाभले आहे. २०२३-२४ या आर्थिक वर्षांमध्ये निव्वळ नफा तीन कोटी ४४ लाख८६८ रुपये २९ पैसे इतका झाला असून नफ्याची विभागणी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ६५ व आपल्या बँकेच्या पोट नियमातील तरतुदी अधिक राहून करण्यात आली आहे. सभासदांना ६.५० टक्के दराने लाभांश देण्याची मान्यता देण्यात आलेली आहे.

या वार्षिक सभेमध्ये सर्व शिक्षक सभासद व नेतेगण मंडळींनी ७७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेपूर्वी बँक प्राथमिक शिक्षक बँकेच्या शताब्दी महोत्सवी वर्षानिमित्त एकमेकांना मनापासून शुभेच्छा देऊन भव्य दिव्य कार्यक्रमाचे नियोजन करण्याचे मान्यता दिलेली आहे. प्राथमिक शिक्षक बँक व गोंधळ ही युती संपुष्टात आली असून यापुढे आता प्राथमिक शिक्षक सहकारी बँकेची वार्षिक सर्वसाधारण सभा ही महाराष्ट्रातील सहकारी चळवळीला दिशादर्शक ठरेल. अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.